| | |
|---|---|
| MHNG030045952026 | **फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७८९/२०२६**<br>**भुफीलेंदर रामचरण सिंग वि. महाराष्ट्र शासन** |

## निशाणी १ वरील आदेश

अर्जदार यांनी कळमना पोलिस स्टेशन, नागपूर येथे गु.र.क्र.९६१/२०२५, कलम १२३, २२३, २७४ व २७५ भारतीय न्याय संहिता सहकलम २६(२)(१), २६(२)(४), २७(३)(ई), ३(१)(zz)(v), ३०(२)(ए) व ५९ अन्न सुरक्षा व मानदे कायदा अन्वये नोंद असलेल्या गुन्ह्यामध्ये जप्त केलेला चारचाकी ट्रक Eicher Pro 3019 M SLP HSD BS6 वाहन रजि. क्र. RJ-11-GD-9675, चेसीस क्र. MC2CAMRCOTH136633, इंजीन क्र. E426CDTH541234 व वनप्लस कंपनीचे दोन CE-3LITE9 मोबाईल IMEI No. 861370065512753 व IMEI No. 868134073810499 चा अंतरीम ताबा मिळण्याकरीता भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ५०३ नुसार अर्ज दाखल केला आहे.

**२.** अर्जदार यांच्या कथनानुसार अर्जात नमुद वाहन हे अर्जदार यांच्या मालकीचे असून अर्जात नमुद मोबाईल हा अर्जदाराच्या पत्नीचा आहे. अर्जदाराच्या पत्नीने सदर मोबाईलचा ताबा मिळण्याकरीता अर्जदारास मुखत्यार पत्राद्वारे नियुक्त केलेले आहे. वर नमूद गुन्ह्याकामी पोलिसांनी सदरचा मुद्देमाल जप्त केलेले आहे. सदर मुद्देमालाची गुन्ह्याच्या तपासाकामी आवश्यकता नाही. सदरच्या मुद्देमालाची अर्जदारास आवश्यकता असल्याने त्यांनी सदर मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्याची विनंती केली आहे. सदर मुद्देमालाचा ताबा मिळाल्यास अर्जदार त्याचे मुळ स्वरुपात कुठलाही बदल करणार नाही व सदर मुद्देमालाचे हंस्तातरण करणार नाही असे अर्जदारांनी नमूद केलेले आहे.

**३.** संबंधित तपासी अधिकारी यांनी निशाणी ०४ प्रमाणे खुलासा दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. विद्वान सरकारी वकील यांनी खुलासा दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**४.** अर्जदार यांनी त्यांचे कथनाच्या पुष्टीकरीता निशाणी ०३ व ०५ सोबत अर्जात नमुद वाहनाचे तपाशिलाची, ट्रान्सपोर्टचा परवान्याची, वाहन विम्याची व वाहन चालविण्याच्या परवान्याची, आधार कार्डची छायांकित प्रत व एफआयआर ची प्रत इ. दस्त दाखल केलेली आहे. तसेच मोबाईलचे बिलांची व मुखत्यार पत्राची पडताळणी केलेली प्रत दाखल केलेली आहे.

**५.** अर्जदार यांनी दाखल केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्रावरुन अर्जात नमूद वाहन हे अर्जदाराचे नावे नोंदणी असल्याचे दिसुन येते. तसेच अर्जात नमुद मोबाईल हे अर्जदाराच्या पत्नीच्या मालकीचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच अर्जदाराच्या पत्नीने अर्जदारास सदर मोबाईलचा ताबा घेण्याकरीता मुखत्यार पत्राद्वारे अधिकार दिल्याचे देखील दिसून येते.

**६.** अर्जात नमूद वाहन व मोबाईल पोलिस स्टेशनला जास्त दिवस पडुन राहील्यास त्यात निश्चितच तांत्रीक बिघाड निर्माण होण्याची शक्यता आहे व तसे झाल्यास अर्जदाराचे नुकसान होईल हे देखील स्पष्ट आहे. सुंदरभाई अंबालाल देसाई वि. गुजराथ राज्य ए.आय.आर. २००३ मा.सर्वोच्च न्यायालय ६३८ या न्यायनिर्णयातील मा.सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वानुसार अशा जप्त मुददेमालासंबंधी त्वरीत आदेश करणे आवश्यक आहे. संबंधीत तपासी अधिकारी यांनी गुन्हयाच्या चौकशीकामी वाहनाची व मोबाईलची आवश्यकता असल्याबाबत काही नमुद केलेले नाही. त्यामुळे अर्जात नमुद वाहन व मोबाईल योग्य त्या अटी-शर्तीवर अर्जदारांच्या ताब्यात दिल्यास अभियोग पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. अर्जात दाखल दस्तऐवजांवरुन व खुलाशाचे अवलोकन करता अर्जदार हे अर्जात नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्यास पात्र ठरतात. सबब खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जात नमूद गु.र.क्र.९६१/२०२५ अन्वये नोंद असलेल्या गुन्ह्यामध्ये जप्त केलेला चारचाकी ट्रक Eicher Pro 3019 M SLP HSD BS6 वाहन रजि. क्र. RJ-11-GD-9675, चेसीस क्र. MC2CAMRCOTH136633, इंजीन क्र. E426CDTH541234 व वनप्लस कंपनीचे दोन CE-3LITE9 मोबाईल IMEI No. 861370065512753 व IMEI No. 868134073810499 चा अंतरीम ताबा रक्कम रुपये ३५,२०,०००/- (रुपये पस्तीस लाख विस हजार मात्र) चे सुपूर्तनामा सादर केल्यानंतर खालील अटी व शर्तीवर इतर गुन्ह्याच्या कामी आवश्यकता नसल्यास अर्जदार **भुफीलेंदर रामचरण सिंग** यांना देण्यात यावा.

अ. जप्त मुद्देमाल आहे त्या स्थितीत ठेवण्यात यावे. त्याचे रंगात, आकारात अथवा कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येवु नये व मुद्देमाल हे इतर कोणालाही हंस्तातर किंवा विक्री करण्यात येवु नये.

ब. न्यायालय आदेश करेल त्यावेळी सदर मुद्देमाल आदेशित स्थळी हजर करावे.

क. संबंधीत अर्जदार यांनी सदर मुद्देमालाचे मुळ दस्त ताबा घेतेवेळेस तपासी

अधिकारी यांचे अवलोकनाकरीता हजर करावे. तपासी अधिकारी यांनी मूळ दस्तऐवजांचे अवलोकन केल्यानंतरच वर नमुद मुद्देमालाचा अंतरीम ताबा संबंधीत अर्जदारास द्यावा.

३. अर्जदार यांना सदर मुद्देमालाचा ताबा देण्यापुर्वी संबंधित तपासी अधिकारी यांनी जप्त मुद्देमालाचा साक्षीदारांसमक्ष पंचनामा तयार करुन व अर्जदाराच्या खर्चाने मुद्देमालाचे रंगीत छाया़चित्रे काढुन दोषारोपपत्रासह न्यायालयात दाखल करावे.

PATIL NILESH BHASKAR

Order
Digitally signed by PATIL NILESH BHASKAR
Location: Nagpur
Date: 2026.03.30 11:12:03 +0530

दिनांकः १८-०३-२०२६.

(निलेश भा. पाटील)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.३, नागपूर.

# **Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. File of order are same word to word as per original order.

Name of Stenographer : Smt.V.N.Meshram